# श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी

पोस्ट – शिर्डी , तालुका –राहता, जिल्हा – अहमदनगर -४२३१०९
दुरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८५००, २५८८१०.

---

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीसाठी मा.कामगार व औद्योगीक न्यायालय, अहमदनगर येथे संस्थानचे वतीने न्यायालयात कामकाज पहाण्यासाठी ॲडव्होकेट पॅनल तयार करावयाचे आहे. त्यासाठीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. मा.कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालयातील संस्थानचे कामकाज पहाण्यासाठी इच्छुक अर्जदारांचा मा.कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालयातील कामकाजाचा १० वर्षाचा नियमित सराव असावा.

२. अर्जदार किंवा फर्म यांची मा.कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालय, अहमदनगर / बार कौन्सील महाराष्ट्र आणि गोवा येथे नोंदणी झालेली असावी.

३. अर्जदारावर कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा कुठल्याही न्यायालयात दाखल झालेला नसावा किंवा प्रलंबीत नसावा. तसेच कुठल्याही पोलीस स्टेशनला त्यांचे विरुध्द फौजदारी तक्रार दाखल झालेली नसावी किंवा प्रलंबीत नसावी. व याबाबत त्यांनी सक्षम प्राधिका-यांसमोर केलेले शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे.

४. विनामुल्य सेवा देणा-या अर्जदारांना प्राधान्य देण्यात येईल. तथापी जे विधिज्ञ फी स्विकारु इच्छितात त्यांनी मा.कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालयातील संस्थानच्या प्रकरणाची एकुण फी किती आकारणार संस्थानने एखाद्या विषयाचे बाबतीत आपले कायदेशीर मत मागवल्यास अशा प्रकरणात किती फी आकारणार व इतर तत्सम गोष्टींसाठी किती फी आकारणार, अशा रितीने आपणास संस्थानकडून किती मानधनाची / फी ची अपेक्षा आहे, याबाबतचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये करावा.

५. अर्जदार यांनी यापुर्वी मा.कामगार न्यायालय व औद्योगीक न्यायालयात संस्थानच्या विरोधात काम केलेले नसावे. तसेच सध्याही अर्जदार संस्थानचे विरोधात काम करत नसावा व संस्थानचे पॅनलवर नेमणूक झाल्यास संस्थानचे हिताचे विरोधात काम करणार नाही, अशी लेखी हमी अर्जदारास द्यावी लागेल.

६. संस्थानचे पॅनलवर नेमणूक केलेल्या ॲडव्होकेटची / कायदा सल्लागाराची नेमणूक ही तातुरत्या स्वरुपात तीन वर्षासाठी किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे आगोदर होईल , तो पर्यंत राहील. तसेच संस्थान पॅनलवर नेमलेल्या ॲडव्होकेटला संस्थानच्या सेवेत नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.

७. पॅनलवरील ॲडव्होकेटच्या संख्येचे बंधन राहणार नाही.

८. संस्थानचे पॅनलवर नियुक्ती झाल्यानंतर अर्जदाराने दिलेली माहिती चुकीची आढळून आल्यास किंवा पॅनलवरील नियुक्तीनंतर अर्जदाराच्या काही आक्षेपार्ह गोष्टी संस्थानचे हिताचे विरोधात आढळून आल्यास त्यांना विना नोटीस संस्थानचे पॅनलवरुन कमी केले जाईल. व सदर अर्जदार विधिज्ञा विरुध्द त्यांचेशी संबंधीत बार कौन्सीलकडे / बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांचेकडे तक्रार करण्याचा अधिकार संस्थानकडे राखून ठेवत आहे.

९. मा.कामगार न्यायालय व मा. औद्योगीक न्यायालयात काम पहाणा-या ॲडव्होकेटने सामान्यपणे आकलन होईल अशी सर्व माहिती व सल्ला संस्थानला द्यावा लागेल.

१०. संस्थान पॅनलवर नेमणूक होणेसाठी अर्जदार – ॲडव्होकेट श्री साईबाबांचा भक्त असावा.

११. संस्थान पॅनलवर नेमणूक केलेल्या ॲडव्होकेटची नेमणूक कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार संस्थानला राहील. व तशी नेमणूक रद्द केल्यावर संबंधीत वकीलाने काम न पहाणे व सुपूर्त केलेले कागदपत्र संस्थानला परत देणे बंधनकारक राहील.

१२. विधीज्ञ हा करदाता असावा

१३. अर्जदारास मौखीक मुलाखतीस स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

इच्छुक ॲडव्होकेटसनी मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे नांवे saibaba@sai.org.in, labour@sai.org.in या ईमेल आयडीवर आवश्यक कागदपत्रांसह दिनांक - ३१/०८/२०२१ पावेतो आपले अर्ज पाठवावे, त्यानंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(कान्हूराज बगाटे, भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

Scanned by CamScanner